॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२५–२६/३२५ दिनांक ०९/०२/२०२६

## अत्यंत तातडीचे कालमर्यादीत परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: केंद्रिय नोडल अकाउंट (C.N.A.) अंतर्गत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी रा.से.यो. अंतर्गत नियमित कार्यक्रम तसेच विशेष शिबिरे करिता PFMS प्रणालीमधून वाटप करण्यात आलेला निधी तातडीने खर्ची पाडणे बाबत.**

संदर्भ: १) डॉ. मिलिंद काळे, राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांचे जा.क्र.रासेयो–२०२६/प्र.क्र.१०/CNA निधी दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६.
२) रासेयो कक्ष, युवा कार्य विभाग, युवा कार्य व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कडील दि. ३०/०१/२०२६ रोजीचा ई–मेल.
३) या कार्यालयाचे निधी वितरण पत्र दि.२६/०८/२०२५, १५/०९/२०२५, व २४/१२/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयी मा. राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये सन २०२५–२६ मध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत नियमित कार्यक्रम तसेच विशेष शिबिरे करिता PFMS प्रणाली मधून संदर्भ क्र. ३ मधील पत्रांनुसार निधी वितरित करण्यात आलेला आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, वितरित करण्यात आलेला निधी अद्यापर्यंत आपणाकडून पूर्ण रक्कम महाविद्यालयांना वाटप करण्यात आलेली नाही तसेच, विद्यापीठे/महाविद्यालये/संचालनालये यांचेकडून अनुदान खर्ची करण्यात आलेला नाही.

संदर्भ क्र. २ मधील ई–मेल अन्वये रा.से.यो. कक्ष, युवा कार्य विभाग, युवा कार्य व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून असे कळविण्यात आले आहे की, PFMS प्रणालीमध्ये CNA खात्याची CNA Model-2 ही scheme चालू ठेवण्याच्या अर्थ मंत्रालयाने दिलेली सूट दिनांक ३१/१२/२०२५ रोजी संपली आहे. त्यानुसार PFMS प्रणालीमध्ये CNA खात्याची सध्याची CNA Model-2 ही scheme बदलून CNA Model-१/1A (TSA) मध्ये रूपांतरीत करण्याकरिता आधीच वाटप केलेले सर्व निधी पूर्णपणे वापरले जाणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयास सन २०२५६–२६ मध्ये नियमित कार्यक्रम तसेच विशेष शिबिरे अंर्तगत महाविद्यालयाच्या ZBSA खात्यात जमा झालेली व खर्च न केलेली शिल्लक रक्कम लवकरात लवकर खर्ची पाडण्यात यावी. जेणे करून CNA खात्याची CNA Model-2 ही scheme बदलून CNA Model-१/1A (TSA) मध्ये रूपांतरीत करण्यासाठी पुढिल कार्यवाही करण्यास मदत होईल. अन्यथा महाविद्यालयाने खर्च न केलेली शिल्लक रक्कम आपल्या CNA खात्यातून काढून घेण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांची राहील तरी सदरील बाबीची गांभीर्यानि नोंद घेवून तातडीने कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

डॉ. मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती

Scanned with OKEN Scanner